# श्री गणपती उत्सव व विसर्जना बाबत अधिका-यांनी आपापली कामे पूर्ण करावीत आयुक्त वि.ना.काळम

सोलापूर दि. ०४/०९/१५ :- सोलापूरातील गणपती उत्सव व गणपती विसर्जना बाबत पालिकेच्या अधिका-यांनी आपल्याला नेमून दिलेली कामे येत्या १३ सप्टेंबर पर्यंत पूर्ण करावीत व दि.५ ते १३ पर्यंत डे वॉईज अहवाल द्यावी दि.१३ सप्टेंबर रोजी मी स्वत: पहाणी करणार आहे.आणि आपल्या कामात कोणीही हयगय करु नये अन्यथा नाईलाजाने कारवाई करावी लागेल अस इशारा आयुक्त वि.ना.काळम यांनी दिले.

आज पालिकेच्या आयुक्त स्वागत कक्ष येथील बैठकीत पालिकेच्या सर्व अधिका-यांची गणपती उत्सव व विसर्जन मिरवणूक मार्ग या बाबत करावयाच्या कामा बाबत चर्चा करणेत आली त्यावेळी आयुक्त बोलत होते.

याप्रसंगी उपायुक्त श्रीकांत मायकलवार सहा आयुक्त सौ अमिता दगडे-पाटील, प्रदिप साठे.अे.अे.पठाण,नगर अभियंता लक्ष्मण चलवादी.सार्व.आरोग्य अभियंता गंगाधर दुलंगे,आरोग्याधिकारी सौ जयंती आडके,यांची प्रमुख उपस्थिती होती.

आयुक्त काळम यांनी असे आदेश दिले की,रस्त्यावरील खड्डे बुजवावे,ठिकठिकाणी पडलेला अजोरा उचलावा मिरवणूक मार्गावर अडथळा येणारे झाडांचे फांदया छाटाचे पुरेशी लाईटची सोय करुन सर्व स्ट्रीट लाईनवरील दिव्यांची दुरुस्ती करावी व विसर्जन ठिकाणी जादा हॅलोजन लावावेत मिरवणूक मार्गावरील अतिकमणे काढावेत,मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा गणपती विसर्जन ठिकाणी पुरेशा प्रमाणत जीवरक्षक नेमावेत निर्मालय गोळा करणेची सोय करावी असे सांगून आयुक्त पुढे म्हणाले की,ज्या सेवकांना जे काम सोपविले त्यांची नावनिशी ऑर्डर काढून त्यात त्यांचा मोबाईल नंबर ,घरचा पत्ता या माहिती सह काढावे पाण्याचे बॅरल ॲडव्हान्स बुकींग करावे यासह अनेक सूचना दिल्या स्टेज,मंडप,कमानी,परवाना करिता पोलिस निरीक्षक विशेष शाखा सोलापूर शहर पोलिस आयुक्त कार्यालय सोलापूर यांच्या नेतृत्वाखाली एक खिडकी योजना चालू करणेत आली आहे.उत्सवाच्या व समारंभाच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप किंवा असे कोणतेही बांधकाम उभारण्यास पोलिस विभागाचे (शहर वाहतूक व शाखा व स्थानिक पोलिस ठाणे) ना-हरकत/सहमतीपत्र घेऊन ते सोलापूर महानगरपालिकेला द्यावे नंतर महापालिका मंडप उभारण्यास परवानगी देईल. या ठिकाणी महापालिका व पोलिस खात्याचे समन्वय राहिल यासाठी सुर्यकांत पाटील पोलिस निरिक्षक विशेष शाखा यांची नेमणूक पोलिस आयुक्त यांनी केलेली आहे.

याप्रसंगी सर्व विभागीय अधिकारी व शख्रा अधिकारी उपस्थित होते.

मा.संपादक,

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करणेस विनंती आहे.

जनसंपर्क अधिकारी
सो.म.पा.